
दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, गुरुवार, दि.२४ जुलै २०२५
वर्ष : ०४, अंक : ३४३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

माणसाला आपल्या दारिद्र्याची
लाज वाटता कामा नये.
लाज वाटायला पाहिजे ती दुर्गुणांची...

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## तापमानवाढीचा नागपूरला धोका; रब्बी पिके व मानवी आरोग्य धोक्यात



**दि.२३, नागपूर :** हवामान बदलाचे परिणाम आता नगरी जीवनावर ठळकपणे दिसू लागले आहेत. विशेषतः २००० नंतरच्या वर्षांमध्ये शहरातील तापमान वाढीचा ठोस ट्रेन्ड दिसून येत आहे. हा फटका आता नागपूरलासुद्धा बसू शकतो. शहरातील वाढत्या तापमानामुळे रब्बी हंगामातील शेती व मानवी आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे.

शहरातील राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेने केलेल्या शास्त्रीय अभ्यासातून हे सत्य समोर आले आहे. शहरात होत असलेल्या सिमेंटीकरणामुळे रस्त्यांवरील वृक्षांचे अस्तित्व धोक्यात आल्याचा दावा करणारी जनहित याचिका शरद पाटील आणि इतर तीन पर्यावरणतज्ज्ञांनी दाखल केली असून ती प्रलंबित आहे. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान मनपाने अलीकडेच शहराचा पर्यावरण (२०२३-२४) अहवाल सादर केला. नीरीने हा अहवाल तयार केला आहे. या अहवालात नीरी शहराच्या पर्यावरणाशी निगडित विविध मुद्द्यांवर अभ्यासपूर्ण निरीक्षणे नोंदविली आहेत. यात १९७० ते २०२४ या कालावधीतील तपशीलवार अभ्यासात स्पष्ट झाले की २००० नंतरच्या सुमारे ७५ टक्के वर्षांमध्ये नागपूर शहरातील सरासरी कमाल तापमानात वाढ झाली आहे.

विशेष बाब म्हणजे उन्हाळ्याच्या तुलनेत मान्सून, मान्सूननंतर व हिवाळ्याच्या कालावधीत ही वाढ अधिक ठळक आहे. मान्सून काळाचा विचार केल्यास, यातील दहा पैकी नऊ वर्षांमध्ये, तर मान्सूननंतरच्या काळात तब्बल ८७.५ टक्के वर्षांमध्ये या तापमान वाढीचा ट्रेन्ड दिसून आला. हिवाळ्यातही ७० टक्के वर्षांमध्ये हा ट्रेन्ड दिसतो. विशेषतः हिवाळ्यातील वाढत्या तापमानामुळे रब्बी हंगामातील गहू, हरभरा, तूर यासारख्या पिकांच्या उत्पादनावर थेट परिणाम होण्याची भीती आहे. तापमान वाढीमुळे वनस्पतींच्या वाढीचा कालावधी कमी होतो, परागसिंचनात अडथळा येतो आणि उत्पादनात घट होते.

**मानवी आरोग्याला त्रासदायक !**

वाढत्या तापमानामुळे खालच्या स्तरावरील ओझोन पातळीत वाढ होते. यामुळे हवेची गुणवत्ता खालावते व त्यामुळे दमा, फुफ्फुसांचे आजार, त्वचारोग, डोळ्यांची जळजळ अशा विविध त्रासांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. हिवाळ्यातील उष्णतेमुळे कोरडे दुष्काळ, वणवे यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमध्येही वाढ होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## डान्स क्लास लावायचाय, आई-वडिलांचा नकार नाशकात अल्पवयीन मुलीचा मृत्यू



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नाशिक :** आई-वडिलांनी डान्स क्लास लावून न दिल्याने रागाच्या भरात एका अल्पवयीन मुलीने विषारी औषध (हार्पिक) पिऊन आपल्या आयुष्याची अखेर केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नाशिकच्या म्हसरूळ परिसरात ही घटना घडली आहे. तिला डान्सचा क्लास लावायचा होता, त्यासाठी ती आई-वडिलांकडे हट्ट करत होती. मात्र, तसं न झाल्याने तिला खूप राग आला आणि तिने रागाच्या भरात हार्पिक प्यायले. २७ एप्रिलला ही घटना घडल्याची माहिती आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

या घटनेनंतर तिला तातडीने मुंबईच्या के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. पण, उपचारादरम्यान तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. याप्रकरणी नाशिकच्या म्हसरूळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेने या अल्पवयीन मुलीच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे. फक्त डान्स क्लास लावून दिला नाही म्हणून आपली मुलगी असं काही करेल, अशी कल्पनाही तिच्या पालकांनी कधी केली नसेल.

याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, मुलीच्या कुटुंबियांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत आणि या प्रकरणाचा तपास सुरू आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, मुलांमध्ये सहनशीलता वाढवण्यासाठी पालकांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

**नाशकात महिला पोलिसाच्या मुलीने आयुष्य संपवलं !**

दोन दिवसांपूर्वी नाशकात आणखी एका तरुणीने आपला जीव दिला. पूजा डांबरे नावाच्या २० वर्षीय तरुणीने आपल्या आयुष्याची अखेर केली. तिने नुकतीच बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाली होती. पूजाची आई नाशिक पोलीस दलात अंमलदार म्हणून कार्यरत आहे. जीव देण्यापूर्वी पूजाने एक पत्र लिहिलं होते, ज्यात तिने तिच्या भावना व्यक्त केल्या होत्या.आई, तुझी कामामुळे खूप धावपळ होते. तुला त्रास द्यायचा नाही. माझा शैक्षणिक खर्च फार आहे. तू टेन्शन घेऊ नको असे पूजाने या पत्रात लिहिले होते.

पूजाचे वडील आणि आई विभक्त राहत होते, त्यामुळे ती आईसोबत राहत होती. आईच्या कामाच्या स्वरूपामुळे आणि ड्युटीच्या तासांमुळे पूजाला पुरेसा वेळ मिळत नव्हता, त्यामुळे ती नैराश्यात होती, असं सांगण्यात येत आहे. शिक्षणाचा वाढता खर्च आणि त्यामुळे आईवर येणारा ताण यामुळे तिने हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. ही घटना आडगाव परिसरातील आहे आणि आडगाव पोलीस ठाण्यात या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## साईबाबांवर अपमानास्पद वक्तव्य; शिर्डीत संतापाचा भडका




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, शिर्डी :** श्रद्धा आणि सबुरीचे प्रतीक असलेल्या साईबाबांवर अश्लाघ्य आणि अपमानकारक वक्तव्य केल्याच्या आरोपांमुळे धार्मिक वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. संत युवराज नावाच्या साधूच्या एका वादग्रस्त व्हिडिओने साईभक्तांच्या भावना अत्यंत तीव्रतेने दुखावल्या असून, शिर्डीसह राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. याबाबत साई भक्तांसह शिर्डी ग्रामस्थांनी साईबाबा संस्थानकडे सदर संत युवराजवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. साईबाबा संस्थान शिर्डी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणार असल्याची माहिती साई संस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली आहे.

या व्हिडिओमध्ये तलवारवाला बाबा अर्थात संत युवराजने अत्यंत खालच्या पातळीची आणि प्रक्षोभक भाषा वापरत साईबाबांचा उल्लेख मुस्लिम आणि व्यभिचारी अशा अश्लाघ्य शब्दांत केला आहे. इतकेच नव्हे, तर देशभरातील मंदिरांमधून साईबाबांच्या मूर्ती हटवाव्यात आणि त्या मूर्ती हातोड्याने फोडून गटारीत टाकाव्यात, असे उघड आवाहन त्यांनी केल्याचे या व्हिडिओत स्पष्ट दिसते. सध्या हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, त्यावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेक साईभक्तांनी संत युवराजच्या या वक्तव्याचा तीव्र निषेध करत, यामागे धार्मिक तेढ निर्माण करण्याचा घृणास्पद हेतू असल्याचा आरोप केला आहे.

साईबाबा हे केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर संपूर्ण जगभरातील कोट्यवधी भक्तांचे श्रद्धास्थान आहेत. सबका मालिक एक आणि श्रद्धा सबुरीचा संदेश देणाऱ्या साईबाबांवर अशा प्रकारची टीका करणे हा समाजातील शांततेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न मानला जात आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता साईभक्त, विविध संघटना आणि स्थानिक नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

दरम्यान, पोलीस प्रशासनाकडूनही याची गंभीर दखल घेतली गेली असून, व्हिडिओच्या सत्यतेची चौकशी सुरू करण्यात आली आहे. लवकरच संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल होण्याची शक्यता असून, धार्मिक तेढ पसरवणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेण्यात येईल, असे पोलिसांनी संकेत दिले आहेत.

कारवाई करण्याची मागणी

साईबाबांच्या दरबारात देशभरातील संत महंत दर्शनासाठी येत असतात. त्याचबरोबर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर संघचालक मोहन भागवत यांच्यासह अनेक मोठे नेते साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येतात. साईबाबांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करण्याचा अधिकार कुणालाही नाही. साईबाबांबद्दल अपमानजनक वक्तव्य करणाऱ्या विरोधात साईबाबा संस्थानने कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी आम्ही संस्थानकडे केली आहे, अशी प्रतिक्रिया माजी नगराध्यक्ष तथा साई संस्थानचे माजी विश्वस्त शिवाजी गोंदकर यांनी दिली आहे.

## संत नामदेव महाराज मंदिराचा जिर्णोद्धार करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२३, पंढरपूर :** समाजातल्या शेवटच्या व्यक्तीला समाजाच्या मुख्यधारेत आणणाऱ्या आणि भागवत धर्माचा विचार आपल्या लेखणी व वाणीने देशभर पोहोचविणाऱ्या संत नामदेव महाराज यांच्या पंढरपूर येथील मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात येईल आणि संत नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी वैश्विक दर्जाचे स्मारक उभारतांना निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. त्यांचे विचार हे त्यांचे खरे स्मारक असून हे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पंढरपूर येथे आयोजित श्री संत शिरोमणी नामदेव महाराज, परिवार व संत जनाबाई यांच्या षष्ठ शतकोत्तर संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, श्री नामदेव क्षत्रिय एकसंघाचे अध्यक्ष महेश ढवळे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गुरु गोविंदसिंग, संत कबीर यांनी संत नामदेवांचा उल्लेख अत्यंत आदराने केला आहे. मीराबाई, नरसिंह मेहता यांच्या काव्यातदेखील नामदेव महाराजांचे विचार पहायला मिळतात. भारताच्या सर्व दिशांना जोडण्याचे आणि खऱ्या अर्थाने भागवत धर्मातील विचार वैश्विक करण्याचे कार्य त्यांनी केले. आपला पारंपरिक व्यवसाय जरी त्यांनी केला नसला सामाजिक समरसतेचे वस्त्र विणण्याचे, संपूर्ण व्यवस्था बदलण्याचे आणि समाजाला एकतेचे मूल्य देण्याचे कार्य नामदेव महाराजांनी केले. संत कबीर, दादू, गरीबदास यांनी विचारांची प्रेरणा संत नामदेवांकडून घेतली. आपल्या संतभूमीत अभंगांच्या माध्यमातून संतांचा हा विचार आपल्यापर्यंत पोहोचला आहे.

***भक्तीचा ओघ संपूर्ण भारतात नेण्याचे संत नाम देवांचे महान कार्य***

संत नामदेव महाराजानी देशातील २२ राज्यात भ्रमण करून भागवत धर्माचा विचार पोहोचविला. परकीय आक्रमणाच्यावेळी समाजात श्रद्धा निर्माण करण्याचे आणि समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी भगवद्गीतेची गंगा मराठीत आणली, त्याला नामदेव महाराजांच्या तत्वज्ञानाचे अधिष्ठान लाभले. या दोघा संतांची भेट वारकरी संप्रदायात अमूल्य विचारांचा संगम म्हणून पाहिले जाते. संत नामदेव केवळ वारकरी नव्हते, तर भारतीय संस्कृतीच्या एकात्मतेचे पाईक होते. त्यांनी भाषेचे बंधन झुगारले, सीमांची कुंपणे तोडली आणि भक्तीचा ओघ संपूर्ण भारतात नेण्याचे कार्य केले. आपल्या ऐतिहासिक यात्रेचा समारोप पंढरपूरला करतांना स्नेहभोजनात सर्वांना एकत्र करून संपूर्ण समाजाला एक करण्याचे कार्य केले. विठ्ठल मंदिरात चोखोबाची समाधी उभी करून विखंडीत समाजाला समाजात जन्माने नव्हे तर कर्माने व्यक्ती मोठा होतो हा संदेश दिला.

***हिंदी साहित्याला नवे भान देण्याचे महान कार्य***

संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीचे हृदयद्रावक दृष्य घटनेचे वर्णन केले. त्यांनी पुंडलीकांपासून जनबाईपर्यंत भक्तांचे चरित्रदेखील लिहिले. आपल्या इतिहासातले पहिले चरित्रलेखक संत नामदेव महाराज होते. त्यांच्या साहित्यात संवाद आहे, नाट्य आहे, अखिल मानवेतेचा विचार करून निर्माण केलेले हे साहित्य आहे. श्रीकृष्णाच्या लीला मराठीत सांगतांना त्यांनी बालकविताही त्यांनी लिहिल्या आहे.

मराठच्या गजलांचे मूळही संत नामदेवांपर्यंत पोहोचतं. सर्व साहित्याची निर्मिती करतांना हिंदी साहित्याला नवे भान देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी हिंदी आणि पंजाबीत अभंग लिहिले. ब्रज भाषा आणि शौरसेनी भाषा त्यांना अवगत होत्या. भाषा हे संवादाचे साधन आहे, विवादाचे साधन नाही, हे त्यांनी दाखवून दिले. भाषा ही मैत्री आणि बंधुत्वाचा धागा आहे हे त्यांनी जाणून घेतले होते. म्हणून शीख धर्मात सर्वोच्च स्थानी असलेल्या गुरू ग्रंथसाहीबमध्ये ६१ पदे संत नामदेवांची आहेत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

***नामदेव पायरीचे दर्शन हा भाग्याचा क्षण***

संत नामदेव महाराजांच्या ६७५ व्या संजीवन समाधीच्या निमित्ताने नामदेव पायरीचे दर्शन घेणे आणि तिथली ऊर्जा प्राप्त करून घेणे हा भाग्याचा दिवस असल्याचे नमूद करून श्री.फडणवीस म्हणाले, या पायरीच्या दर्शनाने प्रत्यक्ष पांडुरंगाचे दर्शन घेतल्याचे पुण्य मिळते. नामदेव महाराजांच्या अभंगात 'पायरिचे चिरे' असा उल्लेख आहे, त्यानी याच भावनेने आपले कार्य केले. भागवत धर्माचा विचार हा वैश्विक विचार आहे, तो देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचे कार्य नामदेव महाराजांनी केले. मराठ्यांनी हिंदवी स्वराज्य अटकेपार नेले, परंतु त्यापूर्वी नामदेव महाराजांनी भागवत धर्माचा विचार तिथपर्यंत पोहोचविला. त्यांच्या कुटुंबानेदेखील विठुमाऊलीचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचविले. एकाच परिवारातल्या सदस्यांनी एकाचवेळी संजीवन समाधी घेण्याची घटना केवळ भागवत धर्मात आणि विठ्ठलाच्या भक्तीतच शक्य आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**संत नामदेव परिसर विकासाचे प्रयत्न - पालकमंत्री जयकुमार गोरे**

पालकमंत्री श्री.गोरे म्हणाले, देशाची संस्कृती जपणे, वृद्धींगत करणे, संताच्या विचाराचा प्रसार होणे, आपली प्रेरणास्थळे बळकट करण्यासाठी शासन कार्य करीत आहे. पंढरपूरचा विकास होऊन भव्य कॉरीडॉरची निर्मिती करण्यासाठी नागरिकांना विश्वासात घेण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रयत्न आहे. नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी भव्य स्मारक पंढरपूर येथे उभे रहावे आणि संत नामदेव महाराज मंदिर परिसराचा विकास व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संत शिरोमणी सावता महाराजांच्या स्मारकासाठी १५० कोटींचा निधी देण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने नुकताच घेतल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील लोकांनी परस्परांमधील लहान- मोठे मतभेद बाजूला ठेवून संत नामदेव महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी एकत्रित यावे असे आवाहन श्री.गोरे यांनी केले.

यावेळी हरिभक्त पारायण ज्ञानेश्वर महाराज नामदास व आचार्य तुषार भोसले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सरसंघचालक मोहन भागवत यांनी या कार्यक्रमासाठी दिलेला शुभेच्छा संदेश दाखवण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्यमंत्री महोदयांनी श्री संत शिरोमणी तुकाराम महाराज यांच्या परिवारातील त्यांचे वंशज हरिभक्त पारायण ज्ञानेश्वर महाराज नामदास व अन्य संतांचे पद पूजन केले.

त्यानंतर श्री संत नामदेव महाराज यांच्या संपूर्ण कार्याची माहिती व महिमा लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष संकेतस्थळांचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, तसेच या संजीवन सोहळ्यानिमित्त तयार करण्यात आलेल्या चांदीच्या विशेष नाण्याचे विमोचन ही करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री नामदेव क्षत्रिय एकसंघचे राष्ट्रीय अध्यक्ष महेश ढवळे यांनी केले. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार राजेंद्र राऊत, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आचार्य तुषार भोसले, अभिनेता गोविंदजी नामदेव, ह.भ.प. केशव महाराज नामदास, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, एकसंघचे अध्यक्ष महेश ढवळे, सचिव रुपेश खांडके व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## संपादकीय



### रेल्वेचा खरा विस्तार कधी?

मराठवाड्यातील आठही जिल्हे कित्येक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर थोड्याफार प्रमाणात का होईना रेल्वेसेवेच्या नकाशावर उमटले आहेत. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड आणि हिंगोली हे जिल्हे रेल्वेने जोडले गेले होते. त्यांना मीटरगेजचे ब्रॉडगेज करण्यासाठी कित्येक दशकांचा लढा द्यावा लागला. मागच्या तीन दशकांत लातूर, धाराशिव आणि बीड या जिल्ह्यांत रेल्वे कशीबशी पोचली; पण मराठवाडाभर रेल्वे विस्ताराच्या योजनांची मोठ्या प्रमाणावर गरज आहे.

मराठवाड्यातील पाच जिल्हे 'दक्षिण मध्य रेल्वे'शी, तर तीन जिल्हे 'मध्य रेल्वे'शी जोडले गेले आहेत. त्यामुळे केंद्रात मागण्या मांडताना नेहमीच अडचण होते. गेल्या काही महिन्यांत 'दक्षिण मध्य'च्या नांदेड विभागातून तिरुपती, पंढरपूरसाठी विशेष रेल्वेगाड्या सुरू करण्यात आल्या. काही गाड्यांना मुदतवाढ देण्यात आली. परभणी-मनमाड मार्गावर सिकंदराबाद नगरसोल, नांदेड-फिरोजपूर गाड्या सुरू झाल्या. विशेष रेल्वेची घोषणा करताना त्या मार्गावरील प्रवासी संख्या, प्रतीक्षा यादी, महसूल याचाही विचार करणे आवश्यक आहे. अन्यथा यांपैकी कोणतेही कारण सांगून रेल्वेसेवा बंद केली जाण्याची शक्यता उरते. यामुळे त्या भागावर अन्याय होतो. 'दक्षिण मध्य'कडून नांदेडहून बहुतांश रेल्वे सोडल्या जातात. त्यातून पाच जिल्ह्यांची कनेक्टिव्हिटी होते; पण धाराशिव, लातूर, बीड यांचा विचार केला जात नाही.

नांदेड -पनवेल गाडी पुण्याहून जाते. नांदेड-पुणे, परभणी-पुणे किंवा छत्रपती संभाजीनगर-पुणे असे मार्ग प्रायोगिक तत्त्वावर सुरू करायला हवेत; प्रवाशांचा प्रतिसाद पाहून नियमित गाडी सुरू करण्याबाबत विचार केला जाऊ शकतो. छत्रपती संभाजीनगर ते मुंबई अशी जनशताब्दी एक्स्प्रेस मोठ्या मागणीनंतर सुरू करण्यात आली. कालांतराने तिचा हिंगोलीपर्यंत विस्तार करण्यात आला. 'वंदे भारत' मालिकेत जालना-मुंबई सेवा सुरू झाली. तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी यासाठी पुढाकार घेतला. आता ही गाडी नांदेड ते मुंबई धावणार आहे. काही वर्षांपूर्वी मुंबई-लातूर रेल्वेचा विस्तार बिदरपर्यंत केला गेला. कुठलीही मागणी नसताना केवळ राजकीय हट्टापोटी हा निर्णय झाला. लातूरकरांनी आंदोलन केल्यानंतर तीन दिवस लातूर आणि तीन दिवस बिदर असे वेळापत्रक निश्चित झाले.


या तीन उदाहरणांवरून रेल्वेसेवेचा विस्तार झाला, असे म्हणता येईल. मात्र, विशेष वा नवीन रेल्वे सुरू करताना एखाद्या भागाकडे दुर्लक्ष करणे, लोकांच्या मागणीनुसार रेल्वे सुरू न करणे या गोष्टी पाहता प्रवाशांना सुविधांपासून दूर तर ठेवले जात नाही ना, याचा विचार होणेही महत्त्वाचे आहे. पूर्वी रेल्वेचा अर्थसंकल्प स्वतंत्रपणे सादर केला जात होता. अकरा वर्षांपूर्वी मुख्य अर्थसंकल्पातच त्याचा समावेश केला गेला. त्यामुळे रेल्वेकडून काय मिळाले हे कळण्यास कित्येक दिवस उलटून जातात. पूर्वी प्रत्येक भागाला रेल्वेकडून प्रतिधिनित्व दिले जात होते. आता वेगळेच चित्र दिसते.

रेल्वे चालविण्याचा अधिकार त्या विभागाला, तसेच झोनला देण्यात आला आहे. यामुळे आता प्रत्येक रेल्वेसाठी स्थानिक रेल्वेच्या संघटनेला किंवा लोकप्रतिनिधींना सेवेतील सातत्य, सुधारणांसाठी अधिकाऱ्यांशी बोलावे लागते. तिथून काही प्रतिसाद न मिळाल्यास रेल्वेमंत्री किंवा रेल्वे बोर्डाचे अधिकारी यांना चर्चा करून सुविधा उपलब्ध करून घ्याव्या लागतात. दिल्लीदरबारी ज्याचे वजन जास्त ते लोकप्रतिनिधी आपल्या पदरात जास्त माप टाकून घेण्यात यशस्वी होतात; पण हे प्रत्येक लोकप्रतिनिधीला शक्य होईलच असे नाही. त्यामुळे अडचण मराठवाड्याचीच होत आहे. दक्षिण मध्य रेल्वे प्रशासन मराठवाड्यातील मागण्यांकडे लक्ष देत नाही, असा आरोप रेल्वे प्रवासी संघटनांकडून केला जातो.

यामुळे मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमधील रेल्वेचे जाळे कधी विस्तारणार हा प्रश्न कायम आहे.

# सच्चे रंगकर्मी स्वर्गीय जयंत सावरकर!

मराठी चित्रपट आणि नाट्य सृष्टीतील जेष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांचा आज दुसरा स्मृतिदिन. बरोबर एक वर्षापूर्वी म्हणजे २४ जुलै २०२३ रोजी त्यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले होते. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ रंगभूमीवर आपल्या अभिनयाचे रंग भरणाऱ्या जयंत सावरकर यांच्या निधनाने मराठी रंगभूमीची मोठी हानी झाली. त्यांच्या निधनाने रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला. ३ मे १९३६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात जन्मलेले जयंत सावरकर हे नोकरीसाठी मुंबईत आले. काही काळ त्यांनी मुंबईत नोकरीही केली मात्र अभिनयाचे बाळकडू पिलेल्या जयंत सावरकर यांचे मन नोकरीत रमले नाही. नोकरी सोडून ते नाटकात काम करू लागले. नोकरी सोडून त्यांनी नाटकात काम करणे हे त्यांच्या सासऱ्यांना आवडले नाही. जयंत सावरकर मात्र अभिनय करण्यावर ठाम राहिले. रंगभूमीवर त्यांना जी भूमिका मिळत गेली ती त्यांनी निष्ठेने पूर्ण केली. सुरवातीचे काही वर्ष तर त्यांनी बॅक स्टेज आर्टिस्ट म्हणूनच काम केले मात्र आपल्यालाही आपल्या क्षमतेप्रमाणे नाटकात अभिनय करण्याची संधी मिळेल असा विश्वास त्यांना होता याच विश्वासाच्या जोरावर त्यांना भूमिका मिळत गेल्या. आपल्याला मिळणाऱ्या भूमिकांची लांबी किती मोठी आहे हे त्यांनी कधीही पाहिले नाही. जयंतराव भूमिकेच्या लांबीपेक्षा भूमिकेची रुंदी पाहत म्हणूनच त्यांना काही नाटकात छोट्या भूमिका मिळाल्या मात्र या छोट्या भूमिकेतही त्यांनी स्वतःच्या अभिनयाची छाप सोडली त्यामुळे लवकरच मराठी रांगभूमिवरील एक प्रख्यात अभिनेते म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे त्यांना अनेक नाटकात मुख्य भूमिका मिळाल्या त्या भूमिकांचे त्यांनी सोने केले. एकच प्याला मधील तळीराम, तुझं आहे तुझ्यापाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्ली मधील अंतु बर्वा आणि हरितात्या या त्यांनी केलेल्या भूमिका अजरामर ठरल्या. जुन्या काळातील मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्ताराम यांच्यापासून ते आजच्या काळातील चंद्रकांत कुलकर्णी, मंगेश कदम यासारख्या सर्वच दिग्दर्शकांच्या दिग्दर्शनात त्यांनी काम केले. त्यांनी अभिनय केलेले सौजण्याची ऐसीतैशी, टिळक - आगरकर, ययाती - देवयानी, सूर्यास्त ही नाटके खूप गाजली जवळपास १०० हुन अधिक नाटकात भूमिका केलेल्या जयंतरावांनी ३० हुन अधिक मराठी आणि हिंदी चित्रपटात भूमिका केल्या आहेत. दूरचित्रवाणीवरील काही मालिकातही त्यांनी भूमिका केल्या आहे. नाटक, चित्रपट, मालिका अशा तिन्ही ठिकाणी आपल्या अभिनयाचे रंग भरणारे जयंतराव मात्र प्रेक्षकांना भावले ते नातकातच! सहज सोपा अभिनय करून प्रेक्षकांची मने जिंकण्याची त्यांची खासियत होती म्हणूनच त्यांचा अभिनय पाहताना हा माणूस आपल्या घरातीलच एक व्यक्ती असल्याचा भास प्रेक्षकांना होत असे. त्यांच्या अभिनय कलेसाठी त्यांना अनेक मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषदेने त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवले आहे. १९९७ साली झालेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. एक छोटा माणूस या नावाने त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या निधनाने पाच दशकांहून काळ रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला आहे.



**जेष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## दोन दिवसांपासून तरुण बेपत्ता...

**दि.२३, रत्नागिरी :** कोकणात रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर तालुक्यातील दोन दिवसापूर्वी बेपत्ता झालेल्या तरुणाचा मृतदेह मिळाल्याने खळबळ उडाली आहे. अर्जुना नदीच्याकाठी असलेल्या पुलाजवळ हा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत मिळाला आहे मृतदेहाची ओळख पटली आहे.सचिन जाधव उर्फ बावा (वय ४२) असे या मृत तरुणाचं नाव आहे.राजापूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार हा तरुण शनिवारी १९ जुलैपासून बेपत्ता होता. त्याचा शोध न लागल्याने त्याची बहीण (रा. जुगाई, येळवण) यांनी रायपाटण पोलीस दूरक्षेत्रात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. अर्जुना नदीच्या काठी पुलाजवळ गौंड चिरफळीचा माळ या परिसरात बुधवारी दुपारच्या सुमारास हा मृतदेह मिळाला आहे. या प्रकाराने खळबळ उडाली आहे. बेपत्ता असलेल्या या तरुणाचा शोध नातेवाईक घेत होते. राजापूर पोलिसांकडून यासंबंधी शोध सुरू होता,तपास सुरू होता याच दरम्यान हा मृतदेह मिळाला आहे. या तरुणाचा मृतदेह मिळाले ते समजताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. राजापूर पोलीस निरीक्षक अमित यादव, पोलीस उपनिरीक्षक सुधीर उबाळे यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. परिसराचा पंचनामा करून हा मृतदेह राय पठाण ग्रामीण रुग्णालयात पुढील कार्यवाहीसाठी शिवविच्छेदनाकरता करता देण्यात आला.

## गतहारी...

गतहारी अमावस्या
पवित्र असते खरी
दिवे समया लख्ख
पुजा चाले घरोघरी

अमावस्या बदनाम
कुणी बोले रे गटारी
अभक्ष भक्षण करी
मद्यधुंद रात्र साजरी

कृष्ण कृत्ये स्मशानी
करती काही अघोरी
भयभीत करे लोकां
भरे आपली तिजोरी

दिवस रे प्रकाशमान
रात्र नेहमीचं अंधारी
पट्टी बांधी डोळ्यांस
असते कुणी गांधारी

अंधश्रध्दा भारलेली
मनोऋग्णां आजारी
मनात भरायला भय
असती नित शेजारी

सावजा पकडायला
टपून बसले शिकारी
फूस लावती नतद्रष्ट
आवाज देती हाकारी

**-- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# कलगी तुऱ्याला आध्यात्मिकतेची जोड; सोज्वळ कलगी तुरा रसिकांना भावला...!





कोकणातील कलगी तुरा लोककलेत प्रतिवर्षी आयोजनात सातत्य राखत पिंपळवाडी विकास मित्र मंडळ (मुंबई ग्रामस्थ-कासे) ता.संगमेश्वर जि. रत्नागिरी ह्या मंडळाच्या वतीने २०२५ मोसमातील कलगी तुरा कार्यक्रम रविवार दिनांक २० जुलै २०२५ रोजी छत्रपती शिवाजी मंदिर (दादर) मुंबई येथे रसिकांच्या हाऊसफुल्ल गर्दीत तसेच कलगी तुरा समाज उन्नती मंडळा-मुंबई संस्थेचे सहसचीव सुधाकर मास्कर, शाहीर किशोर धनावडे (धामापूर)वासुवाणी घराण्याचे अनंत मुंगळे, शाहीर शरद कदम, शाहीरा तेजल पवार-गोताड, सामाजिक कार्यकर्ता /पत्रकार उदय दणदणे आदी विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवर मंडळी यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रमातून भानुदास घराण्यातील शाहीर किशोर धनावडे यांच्या वंशावळीतील कलगीवाले शाहीर चंद्रकांत चांदिवडे यांचे शिष्य नवोदित गायक रोहित चांदिवडे आणि मुळ गादी बाबू रंगेले अखंड वासुवाणी घराण्यातील तुरेवाले शाहीर योगेश कातकर यांचे शिष्य नवोदित गायक सूरज कातकर यांच्या सुमधुर आवाज, सुरेल गायन, नृत्याविष्काराने हा कलगी तुऱ्याचा जंगी सामना विविधांगाणे लक्षवेधी ठरला, कलगीतुरा संहितेच्या चौकटीत राहून ग्रंथीक, आध्यात्मिकतेची जोड देऊन ही कलगी तुरा सादर करून रसिकांची मने जिंकता येतात ह्या कार्यक्रमातून प्रकर्षाने अधोरेखित झाले.

कोकणातील लोकप्रिय तितकीच विविधांगाने बहुचर्चित असलेली कलगी तुरा लोककला आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या डिजिटल युगात, सोशल मीडियाच्या माध्यमातून जगाच्या कानाकोपऱ्यात जलदगतीने पोहचत आहे. याचा अवघ्या कोकण मनाला अभिमान वाटतो, आणि तो असायलाच हवा, मात्र आज ह्या लोककलेत अनादी काळापासून चालत आलेल्या कलगी तुरा लोककलेचा आध्यात्मिकतेचा मूळ गाभा, बाज, याकडेच आज काही अपवाद वगळता अनेक शाहिरी कलाकार बगल देत कलगी तुरा या पारंपरिक लोककलेतील आध्यात्मिक हा मूळ गाभाच कुठेतरी हरवत चालल्याची रसिक,जेष्ठ लोककलावंत, ग्रंथ वाचक, अभ्यासक यावर अनेकदा चिंताजनक खंत व्यक्त करतात याकडे शाहिरी कलाकार यांनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

काही वर्षे मागे पाहता शाहीर कलाकार जंगी सामन्यात आपली बाजू सर करण्याच्या ओघात सादरीकरणात अनावधानाने स्त्री-पुरुष व्यंगावर भाष्य केले गेल्याने कलगी तुरा लोककलेला अश्लीलतेचा डाग लागला परिणामी रसिकांनी त्यात महिला रसिकांनी कार्यक्रमांकडे पाठ फिरवली, नाही म्हटलं तरी यादरम्यान लोककलेची मोठी हानी झाली म्हटले तर वावगे ठरू नये, हे कुठेतरी थांबावं यासाठी सोज्वळ कलगी तुरा आयोजित करण्यावर भर दिला गेला, यासाठी आयोजक, गाव-वाडी मंडळ, संयोजक, निर्माते यांचे योगदान फार मोठे आहे. आणि म्हणूनच आज लोककलांच्या संवर्धनात आयोजक हा महत्वपूर्ण धागा मनाला जातो. लोककलेत बदल जरी काळाची गरज असली तरी आजही कलगी तुरा परंपरेत लोककलेचा मूळ बाज, साज, ग्रंथीक, पारंपरिकता व आध्यात्मिकतेची सांगड घालून कोकणातील अनेक गाव- वाडीवर ही लोककला जोपासली जाते याचे उत्तम उदाहरण म्हणजेच रविवार दिनांक २० जुलै २०२५ रोजी पिंपळवाडी विकास मित्र मंडळ (मुंबई ग्रामस्थ कासे) संगमेश्वर, आयोजित नवोदित शाहिरांची कलगी तुऱ्याची जुगलबंदी होय.

**उदय गणपत दणदणे**
**सामाजिक कार्यकर्ता/पत्रकार**
**(निवोशी-गुहागर)**

कलगीवाले शाहीर चंद्रकांत चांदिवडे यांचे शिष्य रोहित चांदिवडे आणि तुरेवाले शाहीर योगेश कातकर यांचे शिष्य सूरज कातकर अशा नवोदित शाहिरांत रंगलेली कलगी तुऱ्याची ही जुगलबंदी नवोदित शाहिरांच्या सुरेल आवाजाने अवघा नाट्यगृह मंत्रमुग्ध झाला, दोन्ही शाहिरांना तसेच त्यांचे कविवर्य यांना रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला, मूळ कलगी तुऱ्याला कुठेही बगल न देता ग्रंथिक, आध्यात्मिक आधारे दोन्ही शाहिरांनी जनप्रबोधनावर भर देत कलगी तुरा लोककलेची प्रतारणा करणाऱ्या शाहिरांना सोज्वळ कलगी तुरा कसा असावा याचा आदर्श दिला.

कलगी तुरा परंपरेतील संगमेश्वर तालुक्यातील कासे गावचे जय वाघोबा नृत्य कलापथक गेली ५३ वर्षे कलगी तुरा लोककलेची अविरत सेवा आणि संवर्धनासाठी कार्यरत असून मौखिक व ग्रंथीक अशा दोन संगमातून कोकणातील लोककलेचा आणि लोकसंस्कृतीचा प्रवाह अखंडपणे चालू ठेवणारे तुरा पंथातील मुळ गादी बाबु रंगेले घराण्यातील गुरुवर्य वासुवाणी संप्रदायाचे शिष्य कोकण भुषण पुरस्कार सन्मानित गुरुवर्य शाहीर कै.गंगारामजी गोताड खऱ्या अर्थाने ह्या मंडळाचे मार्गदर्शक आधारवड राहिले, आपल्या बोली भाषेतून ग्रंथीक अध्यात्माचा अर्थ सांगून प्रबोधनात्मक मनोरंजनातून नैतिकतेची मूल्ये सजविणारे ह्या लोककलेतील स्वतंत्र विद्यापीठच होते. आज त्यांची शिष्य मंडळीही कलगी तुरा संहितेतील गुरुपरंपरा कायम ठेवत पुढे वाटचाल करत आहेत.

आपल्या गुरुजन, पूर्वजांकडून वारस हक्काने मिळालेल्या ह्या लोककलेला त्यांचे शिष्य गण चंद्रकांत कातकर, संजय गोताड, ग्रंथ अभ्यासक शाहीर योगेश कातकर, आदी नाच मंडळातील कलाकार तेवढ्याच ताकदीने या लोककलेचा आध्यात्मिक पाया सर्वार्थाने मजबूत करत आहेत, आपल्या रंजक कलानृत्य आविष्काराने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे, कोकण कला विश्वात अढळ स्थान निर्माण करत जय वाघोबा नृत्य कलापथक कासे (पिंपळ वाडी) मंडळ गेली ५३ वर्षे कलगी तुरा लोककलेची संहिता, गुरुपरंपरा अबाधित ठेवत लोककला जोपासताहेत त्यांची ही उपासना आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कलगी तुऱ्याच्या संहितेला बगल देणाऱ्या शाहिरी कलाकारांना निश्चितच प्रेरणादायी तितकीच आदर्श ठरेल..!


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## झोपडपट्टी सुरक्षा दलाच्या सातारा जिल्हाध्यक्षपदी अभिजीत ननावरे



**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.२३, वाई (सातारा) :** महाराष्ट्र प्रदेश झोपडपट्टी सुरक्षा दलाच्या सातारा जिल्हाध्यक्षपदी अभिजीत ननावरे यांची निवड संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट यांनी जाहीर केली. पुणे येथे संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संस्थापक वैराट यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी झालेल्या निवडीत सातारा जिल्हाध्यक्षपदी सनी ननावरे यांच्या नावाची घोषणा झाली. यावेळी बोलताना श्री.वैराट म्हणाले, सातारा जिल्ह्यात ठीकठिकाणी झोपडपट्टी वसलेली आहे. त्यातील रहिवासी झोपडपट्टी सुरक्षा दलाचे नेतृत्व मानून काम करणारी आहेत. त्यांच्या मूलभूत हक्कासाठी व विकासासाठी सुरक्षा दल कर्तव्य भावनेतून लढा देणारा असून त्यासाठी नव्या पिढीच्या कार्यकर्त्याला संधी म्हणून सनी ननावरे यांची निवड करण्यात येत आहे. जिल्हाध्यक्ष सनी ननावरे म्हणाले, नेते वैराट साहेबांनी माझ्यावर विश्वास दाखवत मोठी जबाबदारी टाकली, त्याला पात्र राहून संघटना मजबूत करणार. झोपडीत राहणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला न्याय देण्याचा व अन्यायाविरुद्ध लढा उभारण्याचा आमचा निर्धार असून सर्वांना बरोबर घेऊन झोपडपट्टी वाशी यांची ताकद उभी करणार असल्याचे सनी ननावरे यांनी आवर्जून सांगितले. यावेळी नूतन जिल्हाध्यक्ष यांचा सत्कार वाई तालुक्याच्या वतीने करण्यात आला. त्यावेळी वाई तालुका अध्यक्ष प्रवीण संकपाळ, सचिन वायदंडे, संतोष बाबर, सुनील भिसे, संतोष फडतरे, करण साठे, मनीषा संकपाळ, विकास वैराट आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## साहित्य क्रांतीज्योत दिंडीचे वाटेगाव ते पुणे आयोजन

**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.२३, वाई (सातारा) :** आंतरराष्ट्रीय किर्तीचे थोर साहित्यिक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न कधी देणार या मागणीसाठी चला जाऊ वाटेगावला ज्योत पेटवू क्रांतीच्या साहित्याची दिंडी निघाली पुरोगामी विचारांची महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल झोपडपट्टी सुरक्षा दल व पथारी सुरक्षा दल या संघटनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष नेते भगवानराव वैराट यांच्या नेतृत्वाखाली साहित्य क्रांतीज्योत दिंडीचे वाटेगाव ते पुणे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दिनांक २८ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता अण्णाभाऊ साठे जन्मभूमी वाटेगाव येथून ते सारसबाग पुणे येथे ३१ जुलै रोजी स्वागत होऊन अण्णाभाऊंना भारतरत्न साठी जोरदार शक्ती प्रदर्शन होणार आहे. साहित्य क्रांतीज्योत दिंडी २८ जुलै रोजी वाटेगाव सकाळी १० वाजता सुरू होईल. रात्रीचा मुक्काम शासकीय विश्राम गृह कराड येथे होईल. दिनांक २९ जुलै रोजी रात्रीचा मुक्काम सर्किट हाऊस सातारा येथे होईल. दिनांक ३० जुलै रात्रीचा मुक्काम शासकीय विश्राम गृह खंडाळा येथे होईल व ३१ जुलै दुपारी बारा वाजता सारसबाग पुणे येथे ज्योत आगमन होऊन स्वागत समारंभ संपन्न होईल. या ४ दिवस चालणाऱ्या साहित्य क्रांतीज्योत दिंडी वाटेगाव ते पुणे दिंडीत सामील होण्याचे आवाहन संयोजन समितीचे प्रमुख मोहम्मद शेख, शिवाजीराव भिसे, दत्ता डाडर, सुनिता जाधव, अभिजीत ननावरे, नितीन वने, दिलीप कांबळे, शिवाजी अवघडे, पंकज शिंदे, प्रवीण संकपाळ, संजय सकटे, सचिन वायदंडे, शरद केंगार, अरुण जाईकर, शाहीन जमादार, संतोष फडतरे यांनी केले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे लोकमान्य टिळक जयंती साजरी



**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.२३, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हुलगे यांच्या अध्यक्षतेखाली लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उत्साहात साजरी करण्यात आली.शाळेचे शिक्षक-प्रतिनिधी नरेश माटवणकर, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.लोकमान्य टिळकांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यालयातील १७विद्यार्थी व विशेष सहावीअच्या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांच्या जीवनकार्याविषयी माहिती सांगितली. सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योती राणे यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले.त्यांनी आपल्या प्रस्ताविकामध्ये लोकमान्य टिळकांच्या जीवनपटाविषयी माहिती सांगितली. उपमुख्याध्यापक अर्जुन हुल्लोळी व पर्यवेक्षक शांताराम बैकर यांनी टिळक हे भारतीय असंतोषाचे जनक, टिळकांना मिळालेली 'लोकमान्य'पदवी याविषमाहिती प्रकट केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष आबासाहेब हुलगे यांनी टिळक हे भारतीय स्वतंत्र सेनानी, शिक्षक, संपादक, लेखक होते असे सांगितले. शेवटी राणे मॅडम यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## संत शिरोमणी नामदेव महाराजांना ठिकठिकाणी अभिवादन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** संतश्रेष्ठ शिरोमणी नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्या निमित्ताने राज्यभरात ठिकठिकाणी त्यांचे प्रतिमा पूजन करून, आरती, विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी संजीवन समाधी सोहळा महाराष्ट्रात आणि पंजाब मधील घुमान येथे आयोजित करण्यात येतो. यंदा ६७५ वे वर्ष असल्याने पंढरपुरात देखील मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येत्या जानेवारीत देखील नागपूर येथे महा अधिवेशन होणार असून लाखो नागरिक येथे जाणार होणार आहेत.

मुंबईत देखील जोगेश्वरी नामदेव मंडळ, वैष्णव शिंपी समाज मंडळ, विलेपार्ले सांताक्रूझ नामदेव मंडळ, नारायणगाव येथील हरिस्वामी मंदिर, कसबा पेठ पुणे, कुंभारवाडा येथील विठ्ठल मंदिर, घाटकोपर पूर्व उपनगरे, सातारकर शिंपी समाज, तर नामदेव समाजोन्नती परिषद, अखिल भारतीय क्षत्रीय शिंपी महासंघ, डोंबिवली शिंपी समाज मंडळ, कांदिवली बोरीवली शिंपी समाज मंडळ आणि इतर अनेक ठिकाणी संजीवन सोहळ्या निमित्त नामदेव महाराजांना अभिवादन करण्यात आले. जोगेश्वरी पूर्व येथील श्री समर्थ शाळेतील १४० आदिवासी विद्यार्थ्यांना यानिमित्ताने किराणा सामान वितरीत करण्यात आले. पंढरपूर येथे देखील नामदेव महाराज भवनाची निर्मिती होत आहे. शासनाने देखील या दिवशी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करावे तसेच विशेष दिन यादीत संत नामदेव यांना स्थान द्यावे अशी मागणी अनेक वर्षांची आहे.

# पनवेल मनपा क्षेत्रात बोगस डॉक्टर शोध मोहीम सुरू...



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, पनवेल :** आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशाने व उपायुक्त प्रसन्नजीत कारलेकर यांच्या सूचनेप्रमाणे पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडून पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील बोगस डॉक्टरांवर कारवाईस सुरुवात करण्यात येणार असल्याचे मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ आनंद गोसावी यांनी सांगितले आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर, तळोजा, कळंबोली, कामोठे व पनवेल येथील खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या संघटने मार्फत खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांची माहिती व संबंधित मेडिकल कॉन्सिल ची नोंदणीची कागदपत्रे, वैद्यकीय पदवी प्रमाणपत्र व बायोमेडीकल वेस्ट प्रमाणपत्र वैद्यकीय आरोग्य विभागाकडे प्राप्त झाली असून त्या अनुषंगाने बोगस डॉक्टर शोध मोहीम कारवाईला सुरुवात होणार आहे.

यासाठी प्रभाग निहाय क्षेत्रीय समिती गठीत करण्यात आली असुन या समिती मध्ये प्रभाग अधिकारी, मुख्य स्वच्छता निरीक्षक व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश आहे. या पथकामार्फत खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या मेडिकल कॉन्सिल ची नोंदणीची कागदपत्रे, वैद्यकीय पदवी प्रमाणपत्र व बायोमेडीकल वेस्ट प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल (एमएमसी), मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन (एमसीआयएम), महाराष्ट्र कॉन्सिल ऑफ होमियोपॅथी (एमसीएच) व महाराष्ट्र डेंटल कॉन्सिल (एमडीसी) या वैद्यक परिषदेकडे नोंदणी नसलेल्या खाजगी वैद्यकीय व्यावसायिकास बोगस डॉक्टर घोषित करण्यात येईल व त्या डॉक्टरावर नजीकच्या पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात येईल. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका व आशा मार्फत संबंधीत क्षेत्रातील खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे प्रमाणपत्रे जमा करण्यात येणार आहेत. तरी ज्या खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या संघटनेमार्फत अद्याप पर्यंत प्रमाणपत्रे जमा केली नाहीत त्यांनी डॉ.सुरेश पंडित वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे जमा करावीत. महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांना ही मोहीम प्रभावीपणे राबवण्याकरिता सर्व खाजगी व्यावसायिक यांनी सहकार्य करावे असे आवाहन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ आनंद गोसावी यांनी केले आहे.

# पाटणमध्ये कोंबड्यांच्या बाजारात लाखोंची उलाढाल !



पाटण आठवडी बाजारात कोंबड्यांची खरेदी करताना नागरिक. छायाचित्र : सुरेश संकपाळ

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२३, पाटण :** सोमवार आठवडी बाजारात कोंबड्यांचा व बकऱ्यांच्या बाजारात खरेदी-विक्रीमध्ये मोठी तेजी दिसत होती लाखोची उलाढाल नागरिकांची कोंबडा कोंबडी घेण्यासाठी झुंबड उडाली होती. काही तासात लाखोंची उलाढाल झाली.

पाटण सोमवार आठवडी बाजारात ग्रामीण भागातून कोंबडा-कोंबडी, काळी अंड्याची कोंबडी, किळी तलंग, खैरा कोंबडा, उपारट्या पक्काचा कोंबडा, काळी पाठ, काळा बोकड, सोमवार आठवडी बाजारमध्ये विक्रीसाठी ग्रामीण भागातून घेऊन आल्याने मोठ्या प्रमाणात खरेदी व विक्री झाली. या विक्रीतून लाखो रुपयांची उलाढाल झाली आषाढ महिना आल्यानंतर वरसल देण्याची लगबग चालू आहे. वरसलीला लागणारे कोंबडा कोंबडी घेण्यासाठी सोमवार आठवडी बाजारात नागरिकांची झुंबड उडाली होती. काळी तलंग ५०० रुपये, काळी अंड्याची कोंबडी ७०० रुपये, खैरा कोंबडा ९०० रुपये, उप्यार्टया पक्काचा कोंबडा ९०० रुपये, काळी पाठ १० हजारापासून ते १५ हजारापर्यंत नागरिक वरसल देण्यासाठी खरेदी मोठ्या प्रमाणात करत होते.

पाटण सोमवार आठवडी बाजारामध्ये कोंबड्याचा बकऱ्यांचा बाजार तेजीत होता. काळी पाठ मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली असल्याने नागरिक खरेदी करत होते.

आषाढ महिना म्हटले की, आखाडी परंपरा अशी तालुक्याची एक वेगळी ओळख आहे. पाटण तालुक्यात ही परंपरा गेली अनेक वर्षे अखंडित सुरू आहे. अनेक देवदेवतांच्या वार्षिक देणंगती देण्याची प्रथा तालुक्यात संगणकीय युगातही टिकून आहे. काळा व खैरा कोंबडा, काळी तलंग आणि उफारट्या पखाचा कोंबडा असे कोंबड्यांचे प्रकार यावर त्याचा दर ठरत असतो. आकाडीसाठी प्रत्येक गावच्या ग्रामदेवतांवर व परंपरेवर कोणत्या प्रकारचा कोंबडा घ्यायचा, हे अवलंबून असते. त्या प्रमाणात त्याचे दर ठरतात. वरील प्रकारांपैकी ज्या प्रकाराला जास्त मागणी, त्याचे दर सर्वांत जास्त असतात.

आकाडीची देणंगत अथवा त्यास वर्षातून एकवेळ देण्यात येणारी म्हणून त्यास वरसल असेही ग्रामीण भाषेत म्हणतात. मंगळवार, शुक्रवार व रविवार या ३ दिवशीच ही देणंगत दिली जाते, अशी परंपरा असली तरी त्या परंपरेपाठीमागे काहीतरी शास्त्रीय आधार असावा. तालुक्यातील तारळे, पाटण, कोयना, चाफळ,चरेगाव, ढेबेवाडी या गावांच्या आठवडा बाजारादिवशी आषाढ महिन्यात कोंबड्यांचा बाजार तेजीत असतो. दोन-चार तासांत हजारो कोंबड्यांची विक्री व लाखोंची उलाढाल आषाढ महिन्यातील आठवडा बाजारात होत आसते.

**कोंबड्यासाठी लागताहेत ९०० रुपये !**

गतवर्षी आठवडा बाजारात एका कोंबड्याला ६०० ते ७०० रुपये मोजले जात होते. मात्र, या वर्षी महागाईमुळे ९०० ते १००० रुपये एका कोंबड्याला मोजावे लागत आहेत. पाटणच्या सोमवार आठवडा बाजारात हक्काने व खात्रीशीर काळी तवंग, अंड्याची कोंबडी, कोंबडा, काळी पाठ बोकड मिळण्याचे ठिकाण आसल्याने खरेदी साठी नागरिक येत असतात.

# आता ज्येष्ठ कलाकारांना दरमहा ५ हजार रुपये मानधन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, ठाणे :** राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजने अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा पाच हजार रुपये इतके मानधन दिले जाणार आहे.

या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी ३१ जुलैपर्यंत 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करावा, असे आवाहन मुंबई शहरचे निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. शिवनंदा लंगडापूरे यांनी केले आहे.

या योजनेसाठी लाभार्थ्याचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असावे. तसेच दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादा ४० वर्षे करण्यात आली आहे. कला व साहित्य क्षेत्रात किमान १५ वर्षांचे योगदान आवश्यक असून वयोमानानुसार ज्येष्ठ असणारे विधवा, परितक्त्या व दिव्यांग कलाकारांना प्राधान्य दिले जाईल. त्याचप्रमाणे कलाकारांचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा अधिक नसावे. ज्या कलाकारांची उपजीविका पूर्णतः कलेवर अवलंबून आहे, व इतर कोणताही उत्पन्नाचा स्रोत नाही, असे कलाकार पात्र ठरतील. केंद्र व राज्य शासनाच्या कोणत्याही महामंडळ किंवा नियमित मासिक पेन्शन योजनेत लाभार्थी असता कामा नये तसेच कलाकार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जासोबत वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पती-पत्नीचा एकत्र फोटो (लागू असल्यास), बँक पासबुक, अपंगत्वाचा दाखला (लागू असल्यास), राज्य व केंद्र सरकारची प्रमाणपत्रे (लागू असल्यास) आणि नामांकित संस्था / व्यक्ती यांचे शिफारसपत्र (लागू असल्यास) ही आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

# मुक्त विद्यापीठाद्वारे सागरी शिक्षण कोर्स !




**अक्षराज जे. के. पोळ**

**दि.२३, ठाणे :** महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांना कौशल्य-आधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असलेल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने सागरी शिक्षण, शिपिंग, लॉजिस्टिक्स आणि संबंधित सागरी उद्योगात कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे. यासंदर्भात नवी मुंबई स्थित नामांकित 'नोव्हा मेरीटाईम अकादमी' (एनएमए) सोबत विद्यापीठातर्फे सामंजस्य करार (एमओयु) करण्यात आला आहे. या कराराद्वारे पदविका, पदवी, आणि पदव्युत्तर शिक्षणक्रम तसेच लघु आणि आणिदीर्घकालीन 'अपग्रेडेशन' आणि 'अक्रेडिटेशन' प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध होईल. त्यानुसार लवकरच दोन वर्ष कालावधीचा 'अ‍ॅडव्हान्स डिप्लोमा इन शिपिंग मॅनेजमेंट अँड लॉजिस्टिक्स', दीड महिने कालावधीचा फॅमिलरायझेशन कोर्स फॉर सीफेअरर्स वर्किंग ऑनबोर्ड इनलँड व्हेसल्स व चार दिवसांचा स्टिअरिंग गियर टेस्ट अ‍ॅज पर सोलास हा सिम्युलेटर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सुरु केला जाईल.

याप्रसंगी बोलतांना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की गरजांवर आधारित आणि व्यावसायिक शिक्षणावर भर देणाऱ्या या करारामुळे सागरी उद्योगासाठी आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाची निर्मिती होऊन, 'ब्लू इकॉनॉमी' वाढीला चालना मिळणार आहे. संपूर्ण महाराष्ट्र आणि किनारपट्टी भागातील बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील आणि भारताची सागरी शक्ती अधिक मजबूत होईल. 'नोव्हा मेरीटाईम अकादमी' चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी मिनानाथ जागडे म्हणाले की या करारानुसार सागरी उद्योगात सातत्याने होत असलेली तांत्रिक प्रगती आणि बदलांशी सुसंगत असे अभ्यासक्रम तयार करून कर्मचाऱ्यांची कौशल्ये अद्यावत ठेवण्यावर विशेष लक्ष दिले जाईल. यामुळे भारतीय नाविक आणि बंदर कर्मचारी जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम होतील. याचा थेट फायदा खलाशी, बंदर कामगार आणि सागरी उद्योगातील कर्मचाऱ्यांना होणार आहे.

करारानुसार अभ्यासक्रमाची रचना, शैक्षणिक संलग्नता, ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया आणि परीक्षांचे व्यवस्थापन, विद्यार्थ्यांना पदवी आणि प्रमाणपत्रे प्रदानतेची जबाबदारी विद्यापीठाची असेल. 'नोव्हा मेरीटाईम अकॅडमी' प्रशिक्षणाची गुणवत्ता, शिस्त, अत्याधुनिक सॉफ्टवेअर साधने, प्रकल्प-आधारित शिक्षण आणि व्हर्च्युअल लॅबची सुविधा सुनिश्चित करणे, पात्र प्राध्यापक आणि प्रशिक्षक उपलब्ध करून देण्याचे काम करेल. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासाचे सर्व साहित्य आणि आवश्यकते नुसार वसतिगृह व भोजन सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांना नोकरी व आंतरवासियता मिळवून देण्याचे काम देखील एनएमए करेल.

यावेळी 'नोव्हा मेरीटाईम अकादमी' चे सहाय्यक संचालक राकेश चव्हाण, व्यवस्थापक अजित सावंत, जेएनपीएचे उपमहाव्यवस्थापक आर.आर. गायकवाड, विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, निरंतर विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम, विद्यापीठ सल्लागार जयवंत ढवळे, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन केंद्राचे संचालक डॉ. मधुकर शेवाळे, डॉ. हेमंत राजगुरू, सोनाली पाटील, सुजाता मोरे, मनोहर पवार, वर्षा पाटील आदी उपस्थित होते.

# आ.मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात सार्वजनिक लोकहिताच्या कामांना गती

## रोजगार हमी योजनेअंतर्गत ५ कोटी ४३ लाख २० हजार रुपयांचा निधी वितरित

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रभावी नेतृत्वात जिल्ह्यातील लोकहिताच्या सार्वजनिक कामांना गती मिळाली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत (मनरेगा) बल्लारपूर विधानसभेतील पोंभुर्णा, मूल व बल्लारपूर तालुक्यातील अपूर्ण सार्वजनिक कुशल कामांसाठी ५ कोटी ४३ लाख २० हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे.



या निधीमुळे स्थानिक पातळीवरील विविध सार्वजनिक कामांना गती मिळणार असून, ग्रामस्तरावर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होणार आहे. तसेच निधीच्या प्रभावी वाटपामुळे गावांमधील मूलभूत तसेच पायाभूत सुविधांशी संबंधित कामे पूर्णत्वास जाणार आहेत. हा निधी आयुक्तालय स्तरावरून प्राप्त निर्देशांनुसार व केंद्र शासनाच्या सूचनांच्या आधारे पोंभुर्णा, मूल व बल्लारपूर तालुक्यांतील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी गावाच्या समृद्ध भविष्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. याशिवाय ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यासाठी आणि स्थानिक स्तरावरच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी हा निधी उपयुक्त ठरणार आहे.

आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात सतत विकासाची गती राखली गेली आहे. गावागावात समृद्धी यावी यासाठी ते सातत्याने पाठपुरावा करत असून, बल्लारपूर विधानसभा समृद्ध करण्यासाठी ते नेहमीच कटिबद्ध आहेत. यामुळे निधीच्या प्रभावी वापरामुळे पायाभूत सोयीसुविधांमध्ये वाढ होऊन गावांमधील सर्वसामान्य लोकांचे जगणे सुसह्य होणार आहे, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# बालविवाह प्रतिबंधासाठी स्वातंत्र्यदिनी ग्रामसभेत ठराव घ्यावा - जिल्हाधिकारी कुंभार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, अकोला :** जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी सर्व विभागांनी प्रयत्न करणे आवश्यक असुन गावोगाव जागृती झाली पाहिजे. येत्या स्वातंत्र्यदिनी दिनांक १५ ऑगष्ट रोजी होणा-या ग्रामसभेमध्ये गावात बालविवाह होणार नाही असा ठराव घेण्याचे आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी येथे दिले.

बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दलाची बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी



अनिता मेश्राम, समितीच्या सदस्य सचिव तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी राजश्री कोलखेडे व इतर अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा बालविवाहमुक्त करण्याकरिता कृती आराखडा तयार करण्याची सूचना जिल्हाधिका-यांनी यावेळी केली. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रतनसींग पवार, बाल कल्याण समितीच्या सदस्य प्रांजली जयस्वाल, राजेश देशमुख, मिलिंद करंदीकर, दर्शन जनईकर ॲड.मनिषा भोरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजेंद्र लाडुलकर, दीपक मसने, रमेश जोशी, बाल न्याय मंडळाच्या सदस्य ॲड सारिका घिरणीकर, तसेच पोलीस प्रतिनिधी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सर्व बालगृहांचे अधिक्षक, बालकांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# उच्च व तंत्र शिक्षण विभागाची आढावा बैठक

## मुंबई विद्यापीठातील ८७ अनुकंपा नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यास मान्यता - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, मुंबई :** मुंबई विद्यापीठातील अनुकंपा तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या ८७ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा आता नियमित करण्यात आल्या आहेत. या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

मंत्रालयात मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उच्च व तंत्र शिक्षण विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी त्यांनी ही माहिती दिली. बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद



मोहितकर उपस्थित होते.

मंत्री श्री. पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व विभागांसाठी १५० दिवसांच्या उद्दिष्टांचा कार्यक्रम निश्चित केला आहे. या अंतर्गत आकृतीबंध अद्ययावत करणे, नियुक्ती नियम (Recruitment Rules) सुधारित करणे आणि अनुकंपा तत्वावरील भरती १०० टक्के करण्यावर भर देण्यात आला आहे.

याच पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठातील अनुकंपा तत्वावरील अनेक वर्षांपासून प्रलंबित नियुक्त्यांचा आढावा घेऊन त्या संदर्भात कालबद्ध नियोजनानंतर संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यात आल्या आहेत. तसेच, सध्या रिक्त असलेल्या अनुकंपाच्या जागांचा पुन्हा आढावा घेऊन तातडीने उच्च व तंत्र शिक्षण विभागातील अशा सर्व रिक्त जागा १०० टक्के भराव्यात, असे निर्देश ही मंत्री श्री.पाटील यांनी बैठकीत दिले.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शन कार्यक्रम जिल्ह्यात लोकांमध्ये प्रभवीपणे पोहचवावा - कौशल्य विकासमंत्री लोढा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, सातारा :** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानव दर्शन कार्यक्रम जिल्ह्यात प्रभवीपणे पोहचविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सर्व जिल्हास्तरीय समित्यांनी समाजातील शेवटच्या घटकाच्या विकासाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे निर्देश कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे एकात्म मानव दर्शनाचा लोक कल्याणकारी विचार युवापिढी पर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि राज्यातील युवा वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावर एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी समितीच्या कामाचा आढावा घेतला.

ॲडिशनल एमआयडीसी सातारा येथील मास भवन या ठिकाणी झालेल्या या बैठकीस आमदार मनोज घोरपडे, अप्पर जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, पोलीस उपअधीक्षक अतुल सबनीस, कौशल्य विभागाच्या उपायुक्त अनुपमा पवार, जिल्हा कौशल्य विकास अधिकारी सुनिल पवार, उद्योग विभागाचे सहसंचालक चंद्रकांत ढेकणे, प्रिया महेश शिंदे, विक्रम पावसकर, अशासकीय सदस्य, विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंगलप्रभात लोढा म्हणाले, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म




मानव दर्शन संकल्पना, त्यांचे जीवन कार्य विचारप्रणाली समाजासमोर जावी यासाठी राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावरती समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. त्यांतर्गत विविध उपक्रम राबविण्याचे शासनाचे निर्देश आहेत. यामध्ये महाविद्यालय स्तरावर, शाळा व विविध मंडळ स्तरावर, आश्रमशाळा, अंगणवाड्या अशा सर्व स्तरावर एकात्म मानव दर्शन विषयक निबंध, वकृत्व, पोस्टर, प्रश्नमंजुषा कथकथन स्पर्धा, परिसंवाद असे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. पंडित दिनदयाळ उपाध्याय यांचे कार्यविचार प्रणाली यांची माहिती शालेय विद्यार्थी, कामगार, महिला, शेतकरी आदी सर्व घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी १ लाख पुस्तके प्रकाशित करुन त्यांचे वितरण करण्यात यावे. त्यासाठी जिल्हा नियोजन मधील निधी उपयोगात आणावा. येणाऱ्या गणेशोत्सवामध्येही गणेश मंडळांच्या माध्यमांतून लोकांमध्ये याबद्दल माहितीचा प्रसार करण्यात यावा.

# विठ्ठल मंदिरात व्हीआर दर्शन सुविधेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३ :** विठ्ठलाची महापूजा आणि विविध रूपे सर्वसामान्य भाविकांना पाहता यावीत यासाठी विठ्ठल मंदिरात व्हीआर दर्शन सुविधेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. गॉगलद्वारे देवाची विविध रूपे आता देशभरातील भाविकांना पाहायला मिळणार आहे. यापूर्वी उज्जैन आणि काशी विश्वेश्वर या देशातल्या दोन ठिकाणी अशा पद्धतीची सुविधा उपलब्ध आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे भक्तनिवास व शहरातील इतर ठिकाणी भाविकांना देवाच्या पूजा व्हीआर गॉगलद्वारे पाहता येणार आहे. अल्प शुल्क असलेल्या या सुविधेमुळे भाविकांना थेट देवाच्या गाभाऱ्यात उभे राहून समक्ष पाहिल्याचा आभास निर्माण होणार आहे. वर्षभरात विठुरायाच्या केवळ मोजक्याच महापूजा होतात, तुलनेत अनेक भाविकांना या महापूजेस उपस्थित राहण्याची इच्छा असल्याने या गॉगलच्या माध्यमातून या महापूजेचा आनंद भाविकांना घेता येणार आहे.

# थोडक्यात

## श्री संत सावता महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२३, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील भवानी पेठेतील श्री संत सावता महाराज मंदिरात, समाधी सोहळा निमित्य अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता. या अखंड हरिनाम सप्ताहात दररोज होणारे कार्यक्रम दुपारी ३ ते ५ 'शिव पुराण' ह.भ.प गजानन महाराज कवडकर, 'हरिपाठ' सायं. ५:३० ते ६:३० वा. 'हरिकीर्तन' सायं. ७ ते ९ वा. या काळात रोज हरिकीर्तन करणारे महाराज ह.भ.प माधव महाराज पैठणकर, ह.भ.प निलेश महाराज निकम, ह.भ.प अशोक महाराज सत्रे, ह.भ.प निलेश महाराज पवार, ह.भ.प डॉ.जलाल सैय्यद, ह.भ.प सागर महाराज भालेराव, ह.भ.प देवराम महाराज गायकवाड आणि 'काल्याचे किर्तन' बुधवार, दिनांक २३ जुलै २०२५ रोजी सकाळी ८ ते १० वा. ह.भ.प गजानन महाराज कवडकर यांनी केले. तदनंतर संपूर्ण गावातून 'दिंडी प्रदक्षिणा' झाली आणि महाप्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी बहुसंख्येने माळी समाज बांधव महिला व पुरुष आणि युवक वर्ग उपस्थित होते.



## युवक कॉंग्रेसच्या शहराध्यक्षांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२२, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील गरजू घरकुल लाभार्थ्यांना घरकुलाचा योजनेचा लाभ मिळवता यावा. याकरिता दिनांक २२ जुलै २०२५ रोजी युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष मुजीब पठाण यांच्या नेतृत्वाखाली नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक शैलेश फडसे यांची भेट घेऊन शहरातील प्रलंबित नवीन डी.पी.आर आराखडा तयार करून घरकुल योजनेतील गरजू असलेल्या घरकुल लाभार्थ्यांची यादी त्वरित शासनस्तरावर मंजूर करावी. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी नगरपरिषदेत वारंवार फेऱ्या माराव्या लागून सुद्धा या मागणीकडे संबंधित अधिकाऱ्याचे दुर्लक्ष होते. शेवटी युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष मुजीब पठाण यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले.



या निवेदनाद्वारे अशी मागणी करण्यात आली की, गरजू घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना डी.पी.आर मध्ये आपले नाव समाविष्ट करण्यासाठी अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागत आहे. पण नवीन डीपीआर आराखडा तयार करून काही तांत्रिकदृष्ट्या असेल तर मंजूर करून घेण्यात येईल अशी मागणी गरजू घरकुल लाभार्थ्यांनी केली आहे. या निवेदनावर शहर युवक कॉंग्रेचे उपाध्यक्ष अविनाश चौदंते, वेदांत शेवटे आणि शहर युवक सचिव आकाश सोनटक्के यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त विधानभवनात अभिवादन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, मुंबई :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती बुधवार,दिनांक २३ जुलै२०२५ रोजी विधानभवनात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी विधानपरिषदेचे सदस्य संजय खोडके, विधानसभेच्या सदस्या सुलभा संजय खोडके, महाराष्ट्र विधानमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे, सचिव डॉ. विलास आठवले, सचिव शिवदर्शन साठ्ये,उप सचिव विजय कोमटवार, उपसभापती यांचे खासगी सचिव अविनाश रणखांब, संचालक, वि.स.पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि. २३, बुलडाणा :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.